RESONET : AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY OPEN ACCESS JOURNAL (RESONET-RIMOAJ)

Volume : 1 Issue: 01 | December 2025

# मराठी साहित्यातील भाषांतराच्या संधी

**प्राचार्य . डॉ .इ .जा.तांबोळी**

**एस. एस .ए. आर्ट्स अँण्ड कॉमर्स महाविद्यालय ,सोलापूर .**

**प्रस्तावना**

भारतातच नव्हे जगाच्या पाठीवर अनेक भाषा बोलल्या जातात. कांही भाषांना चिन्हव्यवस्था आहे, ज्ञात- अज्ञात अशा असंख्य भाषांना चिन्हलिपी नाही आज महाराष्ट्रात असंख्य भाषा अस्तित्वात आहेत की, त्यांना लिपी नाही.

**उदा. :-**

सोलापूर जिल्ह्याचा विचार केला की, कैकाडी, बंजारा, दकखनी, पारधी, खेत्री, बहुरुपी, मरीआईवाले, नंदीबैलवाले, वासुदेव इत्यादींच्या भाषेला लिपी नाही. मात्र ती भाषा आजही त्या त्या समुहात आपले स्थान टिकवून आहे. कोणत्याही परिस्थितीत ती बोलीभाषा आज ही जीवंत आहे.

सोलापूरात कन्नड भाषा बोलणाऱ्यांची संख्याही बहुप्रमाणात आहे. "या कानडीने केला मराठीवर भ्रतार" असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. कानडी भाषेचा मराठी भाषेवर झालेला परिणामाचा विचार इथे नोंदविलेला आहे.

**स्वनिक प्रभाव:-**

मराठी भाषेवर कन्नड भाषेचा स्वनिकच्या रुपाने कसा प्रभाव पडतो तो आपणांस या भाषेवरुन पाहता येते. 'ट, ठ, ड, द, ण' हे मूर्धन्य उच्चार द्राविडी भाषातून मराठीत आले आहे, असे अनेक विद्वानांचे मत आहे. पण वास्तविक मूर्धन्य स्वन हे द्राविडी भाषेतून संस्कृतमध्ये आधी आले, मग प्राकृत व अपभ्रंशातून ते मराठीत आले.

**उदा**. संकट, वसिष्ठ, बाणभट्ट, मंडल हे संस्कृत शब्द आहेत.

मग द्राविडीतून मराठी मूर्धन्य उच्चार आले यांचा अर्थ काय ? याचा अर्थ कन्नड या भाषेमुळे मराठीमध्ये मूर्धन्य उच्चारांचा वापर अधिक वाढला असा घेतला पाहिजे, यांची काही उदाहरणे आपण पाहू

मराठीत 'ळ' या स्वनाचे बाहुल्य आहे. तो कन्नड भाषेचा परिणाम आहे. समर्थ रामदासांच्या काव्यात तर 'ण' आणि 'ळ' यांचा वापर सर्वाधिक झालेला आढतो.

**उदा:-** १)सत्राणे उड्डाणे हुंकार बदनी ! करि डळमळ भूमंडळ सिंधूजळ गगनी

२) अचपळ मन माझे, नावरे आवरीता !

या उदाहरणाने 'ळ' ऐवजी 'ल' वापरल्यास मराठीच्या व्यक्तित्वाला बाधा येईल. काही ठिकाणी तर अर्थहानी होईल.

. **उदा :-** 'अचपळ' ऐवजी 'अचपल' म्हटल्यास चपल नसलेला असा अर्थ होईल.

समर्थांनी अतिचपल या उपसर्गयुक्त शब्दातील 'ति' चा लोप करुन आणि 'ल' चा 'ळ' कार करुन हा शब्द घडविला आहे. कळवळा, बुळीबुळीत, खळाळणे असे किती तरी देशी शब्द मराठीत आहेत. कन्नडमध्ये 'ळ' या व्यंजनाची अगदी रेलचेल आहे.

**उदा :-** बळ्ळोळ्ळी (लसूण), झळझळा (चकचकीत), केळगे (खाली), वोळगे (आत), बहळ (खुप), हेळू (सांग), कोळ्ळू (चोर) असा हा 'ळ' चा सुळसुळाट आहे.

त्याचप्रमाणे मराठी मध्ये तालव्य वर्ण 'च' व 'ज' हे दंतमूलीय वर्णउच्चार फारसीतून आलेला नाही. तो कन्नड भाषेतून मराठी आला असला पाहिजे. या भाषांत 'च' व 'ज' हे दंतमूलीय उच्चार आढळतात.

**उदा**. हुच्च = (वेडा), जो के माडू = (पालन कर)

शुध्द कन्नडमध्ये हे उच्चार नसले तरी उत्तर कर्नाटकातील व्यावहारिक भाषेत ते विद्यमान आहेत, काही कन्नड बोलीत तर ते आहेतच.

**कन्नड भाषेतील शब्द:-**

आजच्या मराठी भाषेत कन्नड शब्द स्थिर झालेले आहेत. ते शब्द मुळचे कन्नड पण आज ते मराठी भाषेत रुढ झालेले दिसतात.

कोणते शब्द कन्नड भाषेतील आहेत, ते शब्द आपण पाहु या ! मूळ कन्नड शब्दांपुढे कंसात मराठी शब्द दिला आहे.

अक्क = (अक्का), अम्म = (अम्मा), अप्प = (अप्पा), अण्ण = (अण्णा), चळणा = (चोळणा), कडब = (कडबू), उसळे = (उसळ), कोसंब्रे = (कोशिंबीर), तुप्प = (तूप), होट्टे = (पोट), अज्ज = (आजा) इत्यादी.

'अडकित्ता' या शब्दांचे मुळ कन्नडमध्ये सापडते. 'अडकी + कोइतु' यावरुन कन्नडात अडकोत्तु व त्यावरुन मराठीत अडकित्ता असा शब्द आला.

'उंडी' हा कन्नड शब्द आहे, त्यांचे मराठीत 'लाडू' असा अर्थ होतो पण ज्ञानेश्वरांच्या अभंगातही कन्नड शब्द दिसतात. ते एका अभंगाच्या ओळीवरुन दिसून येईल.

‘दहिभाताची उंडी लाविन तुझिये तोंडी’

हे ज्ञानेश्वरांच्या अभंगातील उदाहरण सर्वश्रुत आहेच त्याच प्रमाणे गुंड = (गोल) या कन्नड शब्दांवरुन गुंडी = (बटन) गुंडवरुन गावगुंड असा शब्द निर्माण झाला. गुंड = (गोल पातेले) या अर्थाचे शब्द मराठीत आले आहेत. 'रुबणे' हे क्रियापद ही कन्नडमधून मराठीत रुढ झाले. तसेच तुम्ब = (तुडुंब या शब्दांवरुन तुंबणे  हे क्रियापद मराठीत आले.

'शिकेकाई' हा कन्नड शब्द असून 'काई' याचा अर्थ शेंग असा आहे. त्याचप्रमाणे 'बडिस' वरुन जेवायला वाढणे, 'बडी' वरुन बडिवणे, ओदरु वरन ओरडणे.

शरीरावयामध्ये 'बोह' वरुन बोट, 'होट्टि' वरुन पोट असे शब्द आले. तसेच 'इत्त' = येथे आणि इत्तकडे वरुन = इकडे, आत्तकडे = तिकडे आणि'संगड' वरुन सगट ही अव्यये मराठीत आली.

**कन्नडचा व्याकरणिक परिणाम :-**

आजपर्यंत मराठीवर दाविड भाषांच्या परिणामाबाबत जो अभ्यास झालेला दिसतो. तो मुख्यतः शब्द आदानातच च अडकून पडला आहे, असे दिसते. पण आदिकालीन मराठीच्या संदर्भातच विशेषत्वाने झालेला आहे. वस्तुतः व्याकरिणक दृष्टीने कन्नडचा प्रमाण मराठीवर लक्षणीय असा परिणाम झालेला आहे. परंतु कन्नड मराठी अभ्यासकांचे त्याकडे लक्ष गेलेले दिसत नाही.

**होय-होत उपपत्तीः-**

होय-होत यांच्या व्याकरणिक रुपांची संगती मराठीवरुन लागू शकत नाही. विशिष्ट रुप प्रक्रियेचे निदान कन्नडवरुन होण्यासारखे आहे. कन्नडमधील अहद (बोलताना) या अव्ययाचे 'होय / होत' हे भाषांतरित आदान असावे असे वाटते. 'अ' हे अव्यय कन्नडमध्ये क्रियापदाचे प्रकार्य करते.

मराठीचे वाक्य कन्नड वाक्यांच्या रुपात असे असतील.

१) विकारांचा विरोध म्हणजे ब्रम्हचर्च होय.

कन्नड १) विकारक्के विरोध एंदरे (म्हणजे )ब्रम्हचर्य

२)कुत्रा, मांजर हे पाळीव प्राणी होत.

कन्नड २) नादू, बेक्कु, मनुष्यनु साकिद (पाळलेले) प्राणी गळू अहुदु.

हे 'अहुदु' अव्यय सर्वपुरुषी सर्वलिंगी, उभयवचनी सारखेच चालणार, कारण ते क्रियापद नव्हे असाच प्रयोग मराठीत ही होतो.

**उदा**:- गंगा ही पवित्र नदी होय.

परंतु मराठीच्या जीवंतपणाचे कौतुकास्पद वैशिष्ट्ये हे की, तिने 'होय' चे 'होत' असे अनेकवचनी रुप करुन या भाषांतरित कन्नड अव्ययावर मराठी व्याकरणाचा वेष चढविला आहे.

**म्हणजे, म्हणून, म्हणजे उपपत्ती :-**

मराठीत नित्यशः वापरात असलेल्या या अव्ययांचे भाषिक स्पष्टीकरण कन्नडमधील अव्ययांच्या भाषांतरित आदानाच्या आधारे देता येईल, असे वाटते. खालील मराठी वाक्याचे कन्नड रुपे पाहूया !

**उदा:-** 1) तू गेलास म्हणजे मी येईन.

कन्नड रुपात 1) नीतु होदे अंदरे ना बरुत्तेने

2) त्यांनी असे केले म्हणे

कन्नड रुपात 2) अवरु हीगे माडिदरु अंते

3) तो येतो म्हणून म्हणाला

कन्नड रुपात 3) अवनु बरुत्तेने अंत अंदा

कन्नडमध्ये अंतर (म्हणून) आणिअंते (म्हणे) अशी दोन अव्यये आहेत. या अर्थी उपयोग मराठीने अंते (म्हणे) या कन्नड अव्ययावरुन घेतला असणे शक्य आहे, असे ग. ह. खरे यांनीही याकडे लक्ष वेधले आहे.

**पुरे, पाहिजे उपपत्ती :-**

पुरे व पाहिजे ही अव्यये क्रियापदाचे काम करीत आहेत. 'पुरे' नंतर 'आहे' किंवा 'होईल' या क्रियारुपांची गरज पडलेली नाही.

**उदा:-**

१)एवढे केले की पुरे

कन्नड रूपात १) इष्टु माडिदरे साकु

मराठीत 'पुरे' चा असा वाक्यपूर्णार्थक प्रयोग कन्नडमधील 'साकु' या अव्ययात मिळतो. म्हणून मराठीतील वरील प्रकाराचा 'पुरे' हे 'साकु' चे भाषांतरित अनुसरण असावे असे म्हणण्यास जागा आहे.

वाक्यात 'पाहिजे' चा उपयोग हे कन्नडमधील 'बेडक्' या अव्ययाचे भाषांतरित आदान असावे असे वाटते, यांचेउदाहरण पाहू !

**उदा:-** १)संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे

कन्नड रुपात १) संयुक्त महाराष्ट्र आगलिक्के (झालाच) बेडकु (पाहिजे)

यात 'बेडक' चा असा उपयोग झालेला आहे. अशा प्रकारे कन्नडची मराठीवरील प्रभाव यासंबंधीची ही एक उपपत्ती आहे. कन्नड-मराठी या दोन एकत्र नांदणाऱ्या भाषांतील समांतर स्थितीवरुन निघालेले व तुलनात्मक भाषा निरीक्षणाद्वारे निष्पन्न झालेले हे अनुमान आहे. या शोध निबंधाच्या निमित्ताने घेतलेला शोध हा एक स्वल्पविरामच आहे. अभ्यासाचा आवाका खूप मोठा आहे, हे नाकारता येणार नाही.

**निष्कर्ष :-**

(१) हे निश्चितपणे सांगता येईल की, कन्नड शब्द आज मराठीत स्थिर झालेले आहेत.

२) मराठी व कन्नड या दोन्ही भाषेतील स्वनिम विचार किंवा भाषा विज्ञानाच्या दृष्टीने समानता दिसून येते

(३) महाराष्ट्र आणि कर्नाटक सीमेवर बहुप्रमाणात कन्नड आणि मराठी मिळून 'पिजिन' भाषा बोलली जाते

(४) कन्नड भाषेचा परिणाम झाल्याने मराठीचे भाषा सौंदर्य खुललेले आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

**संदर्भ ग्रंथ:-**

१) कन्नड भाषा परिचय - कातगडे पुंडलीकजी.

२) कानडी भाषा प्रवेश - सु. व्यं. दिवेकर.

३)मराठीतील भाषिक विचारांची वाटचाल - गं. ना. जोगळेकर

४) निवडक लेख भाग-२ - ग. ह. खरे.

५)मराठी भाषेची घटना - रा. भि. जोशी